केवळ खाजगी वितरणाकरीता

ECHOES INDIA

श्री राम चंद्र मिशन ®

नोव्हेंबर २०१४ खंड ७ अंक ६





# मणपाक्कम येथील बातम्या

## ऑगस्ट २०१४

### रविवार, दि. ३ ऑगस्ट

गुरुदेवांनी सत्संगाचे संचालन केले व त्यानंतर एक विवाह संपन्न केला. त्यांच्या आजारपणाच्या काळात त्यांना जोडण्यात आलेल्या नळ्यांपासून सुटका झाल्यामुळे गुरुदेवांकडे पाहताना चांगले वाटत होते. ते आपल्या कार्यालयात परत गेल्यानंतर अनेक अभ्यासींनी त्यांच्यासमवेत फोटो काढले. हा एक उल्हासित करणारा व आनंदाचा क्षण होता. थकवा जाणवू लागल्यामुळे त्यांनी उर्वरित दिवस विश्रांती घेतली.

सायंकाळी 'संमोहन' या विषयावर आधारीत 'समव्हेअर इन टाईम' या नितांतसुंदर चित्रपटाचा गुरुदेवांनी आस्वाद घेतला. ९ वाजता चालू झालेला हा दोन तासांचा चित्रपट त्यांनी संपूर्ण पाहिला.

या आठवड्यादरम्यान गुरुदेवांची दिनचर्या म्हणजे ते सहा वाजता जागे होत. भौतिकोपचारांचे सत्र संपल्यानंतर चाकांच्या खुर्चीतून कार्यालयात जात. वर्तमानपत्रे वाचून दाखविण्यात येत असताना न्याहारी करत. त्यानंतर काही काळ बाहेर सूर्यप्रकाशात येऊन बसत.

दि. ४ ऑगस्ट रोजी गुरुदेवांचे पावणेनऊ वाजता आगमन झाले. उपस्थित असणाऱ्या काही अभ्यासींना त्यांनी थोड्या वेळाचे सिटींग दिले. बंगलोर येथील एका डॉक्टर अभ्यासी बंधूची मुलाखत त्यांनी टि.व्ही.वर पाहिली. गुरुदेव ही मुलाखत सुमारे अर्धा तास लक्षपूर्वक, रस घेऊन पाहत होते. मायकेल सँडेल यांच्या 'जस्टीस' या मालिकेतील एक भाग त्यांनी बघितला व ही मालिका त्यांच्या आवडत्या कार्यक्रमांपैकी एक आहे असे ते म्हणाले.

### दि. ५ ते ७ ऑगस्ट, २०१४

गुरुदेवांच्या न्याहारीनंतर एक भगिनी म्हणाली, "गुरुदेव, मी आपल्यापासून दूर असूनही आपण माझ्या समवेत नाही असे मला कधीही वाटत नाही." या विधानाला होकार देत गुरुदेव म्हणाले, "ही सतत स्मरणाची ताकद आहे. तुम्ही कुठेही असलात तरी गुरुदेव सतत तुमच्या समवेत असतात."

न्याहारीनंतर गुरुदेव बराच वेळ उन्हात येऊन बसले. गाझा येथील युद्धाच्या सद्यपरिस्थितीची चौकशी त्यांनी बंधू जॅकी यांच्याकडे केली. इस्राएल व पॅलेस्टाईन यामधील संघर्षाची पाळेमुळे जाणून घेण्यास ते उत्सुक होते. बंधू जॅकी यांनी उपस्थित केलेले सर्व मुद्दे लक्षपूर्वक ऐकल्यानंतर ते म्हणाले, "धर्म हे या युद्धांमागील प्रमुख कारणांपैकी एक आहे" सकाळी ११.३० च्या सुमारास ते कुटीरात परत गेले.

दि. ६ रोजी एक अभ्यासी बंधू गुरुदेवांची भेट घेण्याकरीता आले. "मी असे ऐकले आहे की तुम्ही सत्संगासाठी येत नाही. काय झाले?" अभ्यासीने प्रतिसाद दिला नाही हे पाहून ते पुढे म्हणाले, "केवळ सेवा पुरेशी आहे असे तुम्ही मानू नका. केवळ कर्तव्यापोटी केलेली सेवा आपल्याला प्रगतीच्या दिशेने नेणार नाही. अभ्यासींच्या साधनेत नियमितपणा असणे अनिवार्य आहे." दि. ७ रोजी एका अभ्यासी बंधूंची नवीन गाडी पाहण्यासाठी गुरुदेव कुटीराबाहेर आले. गाडीच्या आतील भागांविषयी त्यांनी प्रश्न विचारले. गाडीमधील सामान ठेवण्याची मोठी जागा पाहून ते प्रभावित झाले. सकाळी ९ वाजताच्या सत्संगाची वेळ साधून त्यांनी उपस्थितांना सिटींग दिले.

### व्हिस्पर्सविषयी चर्चा

दि. ९ रोजी गुरुदेव काही व्हिस्पर्स संदेशांच्या प्रती पाहत होते. एका अभ्यासी बंधूने पुस्तकातले काही उतारे वाचले. गुरुदेवांनी ते



लक्षपूर्वक ऐकले व ते म्हणाले, “ ‘श्रेणी सोपान’ हा शब्द मी अनेक वर्षांपूर्वी वापरला होता, आणि आता बाबूजी तोच शब्द व्हिस्पर्समध्ये वापरत आहेत!” हे ऐकताच सर्वांना हसू आले.

अठरा वर्षांखालील चार युवकांना साधनेची सुरुवात करायची होती. गुरुदेव त्यांना सिटींग देण्यास उत्सुक होते. परंतु त्यांना अत्यंत थकवा जाणवू लागल्यामुळे बंधू कमलेश यांनी या युवकांना सिटींग देण्याचे मान्य केले.

दि. १० ऑगस्ट हा **‘रक्षाबंधनाचा’**(भावा–बहिणीतील प्रेमाचा दुवा साजरा करण्याचा सण) दिवस होता. गुरुदेव सकाळी साडे–सहा वाजता जागे झाले. मुरादाबाद येथील एका अभ्यासी भगिनीने गुरुदेवांच्या मनगटाभोवती राखी (पवित्र धागा) बांधली. त्यांचे कुटुंबिय त्यांना भेटण्याकरीता आले होते व गुरुदेवदेखिल प्रफुल्लित वाटत होते. गुरुदेवांच्या न्याहारीच्या वेळी बंधू कमलेश यांनी ध्यानकक्षामध्ये रविवारचा सत्संग संचालित केला. गुरुदेवांना वर्तमानपत्रे वाचून दाखविण्यात येत असताना ते डोळे मिटून श्रवण करीत होते. सत्संग संपताक्षणीच गरुदेवांनी आतमध्ये जाण्याची इच्छा प्रदर्शित केली.

यानंतर गुरुदेव सूर्यप्रकाशात बसण्यासाठी कुटीराबाहेर आले व सर्वजण त्यांच्या सभोवती शांतपणे बसून राहिले. त्यावेळी काही भगिनींनी पुढे येऊन गुरुदेवांच्या हातावर राख्या बांधल्या.

**गुरुवार, दि. १४ ऑगस्ट २०१४**

न्याहारी व वर्तमानपत्रांच्या वाचनानंतर गुरुदेवांनी अनेक अभ्यासींची भेट घेतली व त्यांच्या प्रश्नांची उत्तरे दिली. चीन येथून आलेली एक भगिनी चायनीज भाषेत गुरुदेवांना म्हणाली “आज सकाळी तुम्हाला पाहून मला आनंद वाटतो”. यावर गुरुदेव विनोदाने म्हणाले, “आज सकाळी तुम्हाला पाहून मला सर्व भाषांमध्ये आनंद वाटतो” हे ऐकून उपस्थितांना हसू आवरले नाही. स्वत: थकलेले असूनही या लहानशा वाक्याने त्यांनी वातावरण हलके केले. एका भगिनीने ती परत जात असल्याचे सांगितले व आयुष्यभर आचरता येईल असा संदेश मागितला. “ते (गुरुदेव) ज्यांच्यावर प्रेम करतात त्या सर्वांवर प्रेम करा” असा संदेश गुरुदेवांनी दिला.

हा पूज्य लालाजी महाराजांच्या महासमाधीचा दिवस होता परंतु गुरुदेव थकले असल्याने त्यांनी एक छोटे सिटींग दिले. ध्यानकक्षातील सकाळी ९ वाजताच्या सत्संगाचे संचालन बंधू कमलेश यांनी केले. सत्संगानंतर वाचून दाखविण्यात आलेल्या व्हिस्पर संदेशात या दिवसाचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले होते व हा दिवस स्मरणामध्ये कशा प्रकारे व्यतीत करावा हे सांगण्यात आले होते.

**शुक्रवार, दि. १५ ऑगस्ट २०१४**

भारताच्या स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून विभागप्रमुख बंधू विनित राणावत यांनी सकाळी ६.३० वाजता ध्यानगृहाजवळ ध्वजारोहण केले. बंधू कमलेश यांनी सकाळी ९ वाजता सत्संग संचालित केला व एक विवाह संपन्न केला. याआधीचे काही दिवस गुरुदेवांना अशक्तपणा जाणवत होता व ते पुन्हा आजारी पडतील अशी धास्ती वाटत होती. परंतु डॉक्टरांनी याचे कारण शोधून त्यावर आधीच उपचार चालू केले, त्यामुळे गुरुदेवांना विषेश त्रास झाला नाही.

**रविवार, ३१ ऑगस्ट २०१४**

सकाळी साडे–सात वाजता जागे झाल्यानंतर गुरुदेवांनी त्यांच्या ई–मेल्स बघितल्या. न्याहारीनंतर वर्तमानपत्र वाचनाचे मोठे सत्र झाले. यानंतर थकवा जाणवू लागल्यामुळे ते आपल्या शयनकक्षात गेले. ते आराम करतील असे वाटत असतानाच बाहेर येऊन सावलीत बसायचे ठरवून त्यांनी सर्वांना सुखद आश्चर्याचा धक्का दिला. यावेळी अनेक विषयांवर प्रदिर्घ अशी चर्चा झाली. यावेळी एक अभ्यासी बंधू म्हणाले, “गुरुदेव, प्रेम ही एक शक्ती आहे असे मला कधीच वाटले नाही, परंतु सहजमार्गामध्ये आल्यानंतर मला प्रेमाची परिणामकारकता लक्षात आली.” आश्रमांविषयी बोलताना गुरुदेव म्हणाले, “जेथे तीस किंवा त्याहून अधिक अभ्यासी असतील अशा ठिकाणी आश्रम असावा अशी माझी इच्छा आहे. सिटींग घेण्यासाठी कोणाच्या घरी जाण्यास संकोच वाटू शकतो, परंतु जर सिटींग्स आश्रमातच होत असतील तर अवघडल्यासारखे वाटण्याचे काहीच कारण नाही.”









## सप्टेंबर २०१४

**द्वारका संकुलातील निवासः**

आश्रमाच्या पाठीमागील बाजूस असलेल्या द्वारका गृहसंकुलातील त्यांच्या सदनिकेचे उद्घाटन करण्यासाठी गुरुदेव तेथे गेले. थोडा पाऊस पडत असतानाही ते गोल्फ कार्टमधून तेथे जाण्यासाठी तयार झाले. तेथे जमलेल्या सर्वांसाठी त्यांनी सत्संगाचे संचालन केले. सत्संगानंतर अतिशय दमलेले असूनही त्यांना निमंत्रितांना भेटवस्तू द्यावयाच्या होत्या. त्यांच्या प्रकृतीविषयीच्या काळजीमुळे डॉक्टरांनी विश्रांतीचा सल्ला दिला असतानाही गुरुदेवांनी आपल्या इच्छाशक्तीच्या जोरावर सर्व काम पूर्ण केले व मगच ते आराम करण्यास गेले.

सायंकाळच्या वेळी सुमारे तीस अभ्यासींच्या समवेत गुरुदेव कुटीराबाहेर बसले होते. काही वेळाने ते आत गेले व लवकरच आपल्या शयनकक्षात विश्रांतीसाठी गेले.

**शनिवार, दि. १३ सप्टेंबरः** गुरुदेव कुटीरामध्ये परत आले व थकवा जाणवू लागल्यामुळे संपूर्ण दिवस आराम केला.

**दि. १५ ते १९ सप्टेंबरः** हा संपूर्ण आठवडा गुरुदेवांनी विश्रांती घेतली. कधीकधी न्याहारीकरीता वा भोजनाकरीता ते आपल्या कार्यालयात येत असत व त्यानंतर आपल्या शयनकक्षात परत जात असत. गुरुदेवांची भेट घेण्याविषयी अभ्यासींवर निर्बंध घालण्यात आले होते. जेव्हा ते कार्यालयात येत असत, तेव्हा तेथे असणाऱ्या काही अभ्यासींना गुरुदेवांना अल्प काळासाठी भेटता येत असे. चेन्नई येथे असलेले ढगाळ व पावसाळी वातावरण जणूकाही कुटीरामधील संथ, काहीशी उदास स्थिती प्रतिबिंबीत करीत होते. या महिन्यामध्ये गुरुदेव कुटीरामध्ये जणू अडकल्यासारखे झाले होते.



न्याहारी व वृत्तपत्र वाचनानंतर काही वेळा गुरुदेव कुटीराबाहेर सूर्यप्रकाशात येऊन बसत असत व भगिनी एलिझाबेथ बाबूजींची पत्रे व लेख वाचून दाखवत असत. मिशनच्या नव्या प्रकाशनासाठी त्या या पत्रांचे संकलन करत आहेत. उन्हात बसायला यायच्या वेळी गुरुदेव दमलेले दिसत असत, परंतु बाबूजींच्या साहित्याचे वाचन सुरू झाल्याबरोबर ते त्यामध्ये रमून जात असत. त्यांच्या सभोवतालचे अभ्यासी शांतपणे, डोळे मिटून बसलेले असल्याने संपूर्ण निस्तब्धता जाणवत असे. वाचनाचे सत्र संपल्यावर गुरुदेवांच्या चेहऱ्यावर निराळे तेज दिसून येत असे व ते कुटीरात परत जाण्याआधी आनंदाने अभ्यासींची भेट घेत असत. गुरुदेवांच्या दिनक्रमात हा एक उत्तम असा बदल होता व तो त्यांना आवडत होता.



## आफ्रिकेचे चर्चासत्र – 'एकत्र असणे'

**दि. १३–२१ ऑगस्ट २०१४**

आफ्रिकेतील फ्रेंचभाषिक देशांसाठी मणपाक्कम येथे आयोजित करण्यात आलेल्या आठवडाभरच्या चर्चासत्रास उपस्थित राहण्यासाठी अंगोला, कॅमेरुन, कांगो (ब्राझाव्हिले), कोट डि आयव्हरी (आयव्हरी कोस्ट) आणि गॅबोन यांचे प्रतिनिधित्व करणारे बारा अभ्यासी आले होते. चर्चासत्रादरम्यान अभ्यासींनी 'एकत्र असणे' याची आवश्यकता आणि महत्त्व विषद करणाऱ्या व्हिस्पर्स यांचे वाचन केले व त्यांवर सविस्तर चर्चा केली. गुरुदेवांनी एका कोट डि आयव्हरी येथून आलेल्या अभ्यासी भगिनीस व एका अंगोलाहून आलेल्या अभ्यासी बंधूस प्रशिक्षक बनविले.

चर्चासत्राच्या उपान्त्य दिवशी, गुरुदेवांनी सहभागी झालेल्या सर्वांची, कुटीरामध्ये भेट घेतली आणि खूपच सखोल व गहन असे सिटींग दिले. त्यानंतरचे प्रश्नोत्तरांचे सत्र खिळवून ठेवणारे झाले. साधनेच्या विविध पैलूंचे महत्त्व या विषयावर कमलेशभाईंनी संचालित केलेले सत्र अतिशय मनोवेधक व डोळ्यात अंजन घालणारे होते. त्यांनी त्यांचे भाषण संपवेपर्यंत, सर्व अभ्यासी गहिऱ्या आध्यात्मिक स्थितीत पोहोचले होते.

## ओणम समारंभ

**दि. ६ ते ८ सप्टेंबर २०१४**

ओणम हा केरळचा सण, गुरुदेवांसमवेत साजरा करण्यासाठी, केरळचे जवळपास ३५० अभ्यासी मणपाक्कमला आले होते. 'थिरुवोणम' (दि.७ सप्टेंबर) रोजी अभ्यासींनी मिळून गुरुदेवांच्या कुटिराच्या प्रवेशद्वारासमोर 'पोक्कलम' (फुलांची रांगोळी) काढली. ती बघण्यासाठी गुरुदेव कुटीराबाहेर आले आणि सणाच्या निमित्ताने सर्व अभ्यासींना शुभेच्छा दिल्या. अभ्यासींना संबोधित करताना त्यांनी संस्कृती, भाषा, धर्म या भेदांच्या पलीकडे जाऊन सामंजस्य आणि एकता ह्यांच्या आवश्यकतेबद्दल सांगितले. सगळ्यांना त्यांनी 'ओणम आनंदमय जावो' अशा शुभेच्छा दिल्या. स्वयंसेवकांनी ओणमसाठी आश्रमाच्या स्वयंपाकघरात मेजवानी बनवली आणि रविवारच्या सत्संगासाठी आलेल्या सुमारे ३००० अभ्यासींना देण्यात आली. संध्याकाळी ध्यान–सभागृहात अभ्यासी भगिनींनी एक सांस्कृतिक कार्यक्रम सादर केला. गुरुदेवांनी कुटीरामधून त्याचा आनंद घेतला. दि. ८ रोजी एक नवीन पोक्कलम बनविण्यात आली व गुरुदेव ती पाहण्यासाठी बाहेर आले. नंतर त्यांनी केरळच्या अभ्यासींशी कुटीराम्ध्ये संवाद साधला.

## तामिळनाडू व कर्नाटकच्या प्रशिक्षकांचे चर्चासत्र

**दि. २३–२७ सप्टेंबर २०१४**

मणपाक्कम येथील ह्या पाच दिवसांच्या चर्चासत्रात एकंदर ४०० प्रशिक्षकांनी भाग घेतला. कमलेशभाईंनी दररोज सकाळी ९ वाजता सत्संगाचे संचालन केले, प्रशिक्षकांना चार दिवस संबोधित केले आणि त्यांनी उपस्थित केलेल्या काही महत्त्वाच्या प्रश्नांची उत्तरे सुद्धा दिली. चर्चासत्राच्या तिसऱ्या दिवशी गुरुदेवांनी 'विनम्रता' या मुख्यविषयावर प्रशिक्षकांना संबोधित केले. ते म्हणाले की, विनम्रता म्हणजे आतून व बाहेरुन समान असणे, आणि स्वत:शी प्रामाणिक असणे. ते स्वत:, त्यांच्या प्रशिक्षक, ज्येष्ठ प्रशिक्षक, सचिव, संस्थेचे अध्यक्ष म्हणून भूमिकांविषयी कधीच चिंतीत नव्हते, त्यांच्यासाठी केवळ बाबूजी महाराजांचा चेला (शिष्य) असणेच पुरेसे होते. त्यांचे जीवन फक्त 'मिशनचे कार्य' ह्यावरच केंद्रित झालेले होते आणि 'जीवनातला सर्वात मोठा आनंद अशा प्रकारे काम करण्यात आहे की ज्यामुळे बाबूजी महाराजांच्या मुखावर हास्य दिसेल' हेच गुरुदेवांसाठी सर्वात मोठे पारितोषिक होते.

जरी गुरुदेव चर्चासत्राच्या काळात प्रशिक्षकांबरोबर राहू शकले नाहीत, तरी दिवसभराच्या कामकाजाविषयी त्यांना आयोजकांकडून महिती देण्यात येत होती. एका अनौपचारिक संवादात गुरुदेव म्हणाले की 'आदर्श व्यक्ती' बनणे हे प्रशिक्षकांसाठी महत्त्वाचे आहे. ते पुढे म्हणाले, "गुरुदेवांना स्व–अंर्तभूत करा आणि त्यांची शिकवण बाह्य–सदृश करा",









एक प्रगल्भ असे विधान जे आपल्या सर्वांना त्यावर काम करण्याकरीता व आचरणात आणण्यासाठी आहे.

कमलेशभाईंच्या उद्घाटनपर भाषणामध्ये प्रशिक्षकांची अभ्यासींशी वर्तणूक तसेच अभ्यासीचा प्रारंभिक अनुभव त्याच्या मिशनमधील निरंतरतेसाठी किती महत्त्वाचा घटक असू शकतो यावर भर देण्यात आला होता. इतर दिवसांमध्ये कमलेशभाईंनी अभ्यासीच्या आध्यात्मिक अवस्थेचे वाचन, व्हिस्पर्सचे महत्त्व आणि अभ्यासींनी नियमित व मन:पूर्वक साधनेद्वारे आजच्या जगामध्ये बदल घडवून आणण्याची भूमिका कशी निभावावी हे विषय हाताळले. 'स्वीकृती'बद्दल बोलताना ते म्हणाले की विनम्रता, निष्ठा व प्रामाणिकपणा हे गुण आपल्याला स्वीकारण्यास मदत करतात पण, दुर्दैवाने आपण पूर्वग्रह, द्वेष, दुसऱ्याला जोखण्याची वृत्ती अशी जड ओझी वाहत असतो. आपण लोकांना सहन करण्यास शिकले पाहिजे आणि हेच आपल्याला स्वीकृतीकडे घेऊन जाईल.

केवळ आपली मातृभाषा अवगत असणाऱ्या काही प्रशिक्षकांच्या सुविधेसाठी गुरुदेवांनी व कमलेशभाईंनी केलेल्या सगळया भाषणांचे तामिळ आणि कन्नड भाषांमध्ये भाषांतर करण्यात आले. त्यांच्या समूहचर्चा झाल्या, वैयक्तिक सिटींग्सचे आदान–प्रदान आणि निरनिराळ्या तऱ्हेची स्वयंसेवेची कामे झाली. समूहात काम करणे किती आनंददायी असते हे सर्व सहभागींना शिकावयास मिळाले.

## चायनीज चर्चासत्र

**दि. २–६ ऑक्टोबर २०१४**

मणपाक्कम येथे झालेल्या चर्चासत्रात चीनच्या मुख्यभूमीहून आलले (११३) अभ्यासींशिवाय टर्कीचे ३ तसेच दक्षिण आफ्रिकेचे १६ अभ्यासी या सहभागी झाले होते.चर्चासत्रादरम्यान कमलेशभाईंनी तीन दिवस या समूहास संबोधित केले तसेच दि. ५ ऑक्टोबर रोजी प्रश्नोत्तरांचे सत्र संचालित केले. ही स्फूर्तिदायक सत्रे सर्वांना फार आवडली आणि आनंददायी वाटली. यादरम्यान कमलेशभाईंनी चीन आणि दक्षिण आफ्रिकेच्या प्रशिक्षकांच्या दोन बैठकी घेतल्या. यामध्ये बहुमोल माहितीची देवाणघेवाण आणि चर्चा झाली.

अंतिम दिवशी रात्री वाचनालयाच्या गच्चीवर चीनच्या अभ्यासींनी बनवलेल्या विशेष चायनीज भोजनाचा सर्वांनी आस्वाद घेतला. यावेळी कमलेशभाई प्रमुख अतिथी होते. प्रत्येक दिवशी संध्याकाळच्या सत्संगानंतर चर्चासत्रात सामील झालेल्या अभ्यासींना गुरुदेवांसमवेत काही शांत, अमूल्य असे क्षण कुटीराच्या प्रांगणात व्यतीत करता आले. ५ दिवसांच्या चर्चासत्रानंतर, दि.७–११ ऑक्टोबरच्या दरम्यान ६५ अभ्यासींनी हिमालयातील सत्खोल आश्रमाला भेट दिली.








**प्रथम वर्षपूर्तीचा उत्सव, व्ही.जी.टी.एम. विभागीय आश्रम, आंध्र प्रदेश**

हा प्रसंग या भागातील अभ्यासींनी रविवार दि. ७ सप्टेंबर रोजी खूप हिरिरीने आणि उत्साहाने साजरा केला. ५ केंद्रे आणि २० उपकेंद्रांचे प्रतिनिधित्व करणारे सुमारे १००० अभ्यासी यात सहभागी झाले होते. हा उत्सव जणू काही छोटा भंडाराच होता. या प्रसंगी तेथे ३ सत्संग आणि अनेक भाषणे झाली. प्रेम आणि त्याग याचा संदेश देणारी नाटुकली, गुंटूर आणि विजयवाडा केंद्रांतील बालकांनी सादर केलेले गोपिकांसह भगवान कृष्ण दर्शविणारे नृत्याविष्कार, अत्यानंदाने शिगोशिग भरलेल्या कविता आणि गीतगायनामुळे सहभागींची हृदये दिव्य अशा तेजाने भरून गेली.

**सहजमार्ग प्रश्नमंजूषा, नवसारी, गुजरात**

दि. ५ ऑक्टोबर २०१४ रोजी नवसारी केंद्रात एक सहजमार्ग प्रश्नमंजूषा आयोजित करण्यात आली. ती भारतातील अतिशय प्रसिद्ध 'कौन बनेगा करोडपती' या टी.व्ही. वरील खेळाच्या कार्यक्रमावर आधारित होती.

अभ्यासींमध्ये अधिक उत्साह निर्माण करावा ही त्यामागची कल्पना होती आणि याचा परिणामस्वरूप म्हणजे फारच कल्पक/ नाविन्यपूर्ण आणि आकर्षक असा प्रश्नमंजूषेचा आराखडा. अभ्यासी बंधूंनी एक कॉम्प्युटराइज्ड कार्यक्रम तयार केला होता आणि सर्व प्रश्न सहजमार्ग आणि मिशन यावर आधारित होते. खेळण्यात रस दाखवणाऱ्या अभ्यासींमधून ९ अभ्यासींना निवडण्यात आले. एकूण १३ प्रश्न विचारण्यात आले. प्रश्नमंजूषेच्या वेळी उपस्थित असणाऱ्यांपैकी प्रत्येकाने खूप उत्साहाने त्यात सहभाग घेतला. मिशनची पुस्तके, गुरुदेवांची छायाचित्रे आणि मिशनची सी. डी./ डी.व्ही.डी. बक्षीस म्हणून देण्यात आली.




**सेवेस तयार रहा, नांद्याल आश्रम, आंध्र प्रदेश**

दि. १२ ते १४ सप्टेंबरदरम्यान विभागात काम करणाऱ्या १७० स्वयंसेवकांसाठी एक ३ दिवसांचे संमेलन आयोजित करण्यात आले होते. सर्व सहभागींना एक महिना आधीपासून पथदर्शी प्रयोगाद्वारे (पायलट) तयार करण्यात येत होते. कमलेशभाईंच्या नित्य व प्रेमळ अशा मार्गदर्शनाखाली बंधू गंगाधर (विभागप्रमुख) हे १५ जणांच्या एका चमूसमवेत या कार्यक्रमाचे समन्वयक होते.

प्रेम, सेवा, आणि ऐक्य हे या कार्यक्रमाचे केंद्रबिंदू होते. या गुणांची स्वत:मध्ये ओळख पटवणे व त्यांचा विकास करणे हे हेतू व्हिस्पर्सच्या संदेशांद्वारे, ग्लिंप्सेस व गुरुदेवांच्या भाषणांच्या डि.व्ही.डी. द्वारे परिश्रमपूर्वक सहभागींना समजावून सांगण्यात आले.

प्रत्येक दिवस सत्संगाने सुरु होत असे. त्यानंतर १० मिनिटे शांतता आणि ग्लिम्प्सेसचा एक भाग पाहण्यात येत असे. दिवसभरात तेथे विविध सत्रे संचालित केली जात असत आणि प्रत्येक सत्रात ठरविलेल्या विषयावरिल एक व्हिस्पर्स संदेश वाचण्यात येत असे. सहभागींना त्यांच्यामध्ये कंपनांचा परिणाम कसा जाणवतो यावर विचार करण्यास व त्यांचा अनुभव नमूद करण्यास सांगण्यात आले. त्यांच्या आंतरिक स्थितीमध्ये एक अव्याहत असे परिवर्तन होत असल्याचे निरीक्षण त्यांनी नमूद केले.

'स्लाइसेस ऑफ इटर्निटी' यावर एक व्हिडिओ आणि 'एक मनुष्यसुद्धा कसा बदल घडवून आणू शकतो' यावरील एक प्रोत्साहनपर व्हिडिओ दाखविण्यात आला. 'एक चिमणी उन्हाळा आणू शकते आणि एक मनुष्य बदल घडवून आणू शकतो' या गुरुदेवांच्या उक्तीला अनुसरुन हे व्हिडिओ दाखविले गेले. प्रत्येक दिवशीच्या कार्यक्रमानंतर प्रशिक्षकांची सभा तसेच युवकांच्या बैठकी घेण्यात आल्या.

या कार्यक्रमादरम्यान अधोरेखित झालेला एक महत्वाचा पैलू म्हणजे आपल्या गुरुदेवांनी केलेल्या सेवेचे उदाहरण. गुरुदेवांनी स्वत:ला संपूर्णपणे विसरून, मानवतेची सेवा करताना फक्त आपल्या गुरुदेवांचा विचार केला. जर कोणतेही काम करताना आपण त्यांचे उदाहरण आपल्या डोळ्यासमोर ठेवले तर आपण त्यांचे अनुकरण नक्कीच करू शकतो.

एक आठवड्यानंतर प्रतिक्रियांचे अर्ज जमा करण्यात आले आणि अभ्यासी गुरुदेवांच्या प्रेमाने जणूकाही बांधले गेले. सखोलपणे साधना करण्यास आणि त्यांच्या केंद्रात काम करताना प्रेमपूर्वक सेवेची भावना जोपासण्यास ते सिद्ध झाले.





## प्रशिक्षक बैठका

### उत्तराखंड

दि. ३० आणि ३१ ऑगस्ट रोजी सत्खोल या हिमालयातील आश्रमात विभाग १८(उत्तराखंड) च्या सर्व केंद्रप्रमुख आणि प्रशिक्षकांचे एक दोन दिवसीय संमेलन विभागप्रमुख बंधूंनी आयोजित केले होते. एका अनौपचारिक अशा वातावरणात अठराजण सहभागी झाले आणि केंद्रांत होणाऱ्या विविध उपक्रमांविषयी त्यांनी चर्चा केली. उत्स्फूर्तपणे काम करण्यास हृदयाचा उपयोग कसा करावा याविषयी सुस्पष्ट अशी जाणीव निर्माण करून कार्यक्रमाची सांगता झाली. एकतेचे आणि बंधूभावाचे एक अद्भूत नाते निर्माण झाले.

### काकीनाडा, आंध्र प्रदेश

दि. १३ सप्टेंबर रोजी आंध्र प्रदेश १–बी विभागातील २५ प्रशिक्षकांची सभा काकीनाडा आश्रमात घेण्यात आली. सकाळी ९ वाजता सत्संग झाल्यानंतर विभागप्रमुखांनी सभेस संबोधित केले आणि त्यांच्या कमलेशभाईंशी झालेल्या संभाषणातून हाती आलेले अमूल्य मुद्दे सांगितले.

सिटिंग्ज कशी द्यावी, आध्यात्मिक स्थितीचे वाचन, सिटिंग देताना देण्यात येणाऱ्या सूचनेची भूमिका, प्रशिक्षकाचे चारित्र्य आणि व्हिस्पर्सचे महत्व या विविध विषयांवर चर्चा झाली. दुपारच्या जेवणानंतर काकीनाडा आश्रमापासून सुमारे २२ किमी अंतरावरील अमरावल्ली आश्रमात कार्यक्रमाची सांगता सत्संगाने झाली. पुढची त्रैमासिक सभा विशाखापटटणम जिल्ह्यातील एजीआर नगर येथे घेण्याचे ठरविण्यात आले.

## भिलवाडा, पूर्व राजस्थान येथे विभागप्रमुखांची भेट

विभाग ७ बी चे प्रमुख डॉ. जे. मधुकर कोचर यांनी प्रशिक्षक पूरणमल बैन्डा यांच्यासमवेत दि. २८ सप्टेंबर रोजी भिलवाड्यास भेट दिली. ११६ अभ्यासी सत्संगास उपस्थित होते. उपस्थितांना संबोधित करताना अभ्यासी बंधू कोचर यांनी गुरुदेवांबरोबर घालविलेल्या काही संस्मरणीय क्षणांबद्दल सांगितले. अभ्यासींवर गुरुदेवांचे कार्य हे अभ्यासी मिशनमध्ये येण्याच्या आधीपासूनच चालू होते आणि गुरुदेव स्वतः आपल्याला मिशनमध्ये घेऊन येतात असे ते म्हणाले. त्यांनी प्रश्न विचारण्याचे आणि स्पष्टीकरण मागण्याचे आवाहन केले आणि अध्यात्मात एकही शंका नसणे ही चांगली स्थिती आहे या टिप्पणीने भाषणाची सांगता केली. न्याहारीनंतर बंधू कोचर यांनी सध्याच्या ध्यानगृहापासून ५ किमी अंतरावरील भिलवाडा येथील नियोजित आश्रमासाठीच्या जागेस भेट दिली. तिथे घालविलेल्या अर्ध्या तासात त्यांनी जागेबद्दल सविस्तर चर्चा केली आणि काही व्यवहार अजून पूर्ण व्हायचे आहेत याकडे लक्ष वेधले. त्यांच्या भिलवाडा भेटीने अभ्यासींना मिशनसाठी अविश्रांतपणे काम करण्यास प्रेरणा दिली.

## नवरात्र उत्सव, वडोदरा, गुजरात

दि. ५ ऑक्टोबर रोजी वडोदरा येथे पारंपारिक कपडे परिधान करून सुमारे ५० बालके आणि युवकांनी नवरात्रौत्सव साजरा केला. सत्संगानंतर मुलांनी सुमारे दीड तास चैतन्यपूर्वक, प्रेमाने आणि बंधुत्वाच्या भावनेने गरबा खेळला, जणूकाही ते गुरुदेवांना एक भक्तीचे नृत्य अर्पण करीत होते. मुलांच्या उत्साहाकडे पाहून, वयस्क अभ्यासींनीही त्यात भाग घेतला. आश्रमात एका हलक्या न्याहारीनंतर सर्वजण घरी परतले.





## यू–कनेक्ट उपक्रम



### स्वयं–विकास अभ्यासक्रम, सिक्किम विद्यापीठ

श्री रामचन्द्र मिशनच्या संयुक्त विद्यमाने सिक्किम विद्यापीठाने 'आध्यत्मिकतेच्या संदर्भात स्वयंविकास: एक प्रत्यक्ष कृतीचा मार्ग' या वैकल्पिक अभ्यासक्रमाचा प्रारंभ केला. युवावर्गाने जी मूल्ये आपल्या जीवनात अंगिकारण्याची अभिलाषा धरावी अशा मूल्यांचा संग्रह तरुणांपुढे ठेवावा, एका आध्यात्मिक ध्येयावर व नीतिमान ऐहिक जीवनावर लक्ष केन्द्रित करून संतुलित जीवन जगण्यासाठी त्यांना सहाय्य व्हावे आणि राष्ट्र उभारणीत त्यांचा सहभाग असावा या उद्देशाने यू– कनेक्टचा आरंभ झाला.

ज्यामुळे उचित मूल्ये अंगी बाणली जाऊन अगदी सहज स्वाभाविकपणे आंतरिक परिवर्तन घडून येईल अशा आत्मपरीक्षण, चिंतन व मनन यासारख्या कौशल्यांनी विद्यार्थ्यांना सुसज्ज करावे या दृष्टीने या अभ्यासक्रमाची रचना करण्यात आली आहे. नैतिकमूल्ये, खऱ्या 'स्व'चा शोध, योग, दिव्यत्वाची संकल्पना, विचारांचे सामर्थ्य, ध्यानाच्या पद्धती, जीवन आणि राहणीबाबतचे सिद्धांत, गुणवत्ता व आम्ही करीत असलेली पर्यायांची निवड आणि प्रेम इ. विषयांचा अभ्यासक्रमामध्ये समावेश करण्यात आला आहे.

दि. ६ सप्टेंबर रोजी अभ्यासक्रमाची सुरुवात झाली. समन्वयक म्हणून बंधू हर्षल जावळे (पुणे), बंधू मिसल मेहता (कोलकाता), बंधू रवि तेलंग (सिक्किम) आणि भगिनी एलिझाबेथ किंग्जनॉर्थ (चेन्नई) यांनी काम पाहिले. विद्यार्थ्यांकडून आलेल्या प्रतिक्रिया सकारात्मक व उत्साहवर्धक होत्या. विद्यार्थ्यांच्या आवश्यकतेनुसार अभ्यासक्रमात सुधारणा करण्यासाठी त्या सहाय्यभूत ठरल्या.

### व्याख्याते व समन्वयकांसाठी प्रशिक्षण कार्यशाळा

#### पुलगाव आश्रम, महाराष्ट्र

यू–कनेक्ट व्याख्याते व समन्वयक अशा २४ जणांसाठी एक प्रशिक्षण कार्यशाळा दि. १७ व १८ ऑगस्ट रोजी पुलगाव आश्रमात आयोजित करण्यात आली होती. नागपूर, चन्द्रपूर, वर्धा, रायपूर (छत्तीसगढ), यवतमाळ व पुलगाव येथील स्वयंसेवक प्रशिक्षणासाठी उपस्थित होते. बंधू श्रीधर थोडा (मुंबई) यांनी सत्रांचे संचालन केले तर सुधीर जी. अकोजवार (केन्द्रप्रमुख,चन्द्रपूर केन्द्र) यांनी कार्यशाळेचे समन्वयक म्हणून काम पाहिले. आर. राजेन्द्रन (विभाग प्रमुख) व पुलगाव केंद्रामधील स्वयंसेवकांनी यजमान म्हणून कार्यशाळा यशस्वी




करण्यासाठी उत्साहाने परिश्रम घेतले.

अभ्यासींनी समूहात काम केले आणि एक प्रतिरूप सत्रही सादर केले. त्याशिवाय विविध खेळ व अन्य उपक्रमातही त्यांनी भाग घेतला. स्थानिक भाषेत अभ्यासक्रम संचालित करता यावा म्हणून एक सत्र मराठीतील पॉवर पॉईंट सादरीकरणासह संचालित करण्यात आले. अखेरच्या सत्रामध्ये पुढील कार्यवाहीसाठी एक नियोजन आराखडा आखण्यात आला. सर्व व्याख्यात्यांनी हुरूप व्यक्त केला.

#### नचिपालयम आश्रम, कोईंबतूर, तामिळनाडू

दि. १५ ते १७ ऑगस्ट दरम्यान नचिपालयम आश्रम, कोईंबतूर येथे आयोजित करण्यात आलेल्या तीन दिवसीय यू–कनेक्ट प्रशिक्षण कार्यशाळेला तामिळनाडू व केरळमधून आलेले सुमारे शंभर अभ्यासी हजर होते. प्रारंभीच्या अनौपचारिक वार्तालापानंतर चेन्नईहून आलेले बंधू श्रीरामन व बंधू कृष्णन यांनी यू–कनेक्टचा खरा अर्थ, विविध संस्थांना भेटी कशाप्रकारे द्याव्यात, तसेच समन्वयक, सहाय्यक आणि व्याख्याते यांच्या भूमिका व जबाबदाऱ्या या विषयांवरील सत्रे घेतली. त्यांनी अभिरूप सत्रेसुद्धा संचालित केली. सहभागी अभ्यासींची १२ गटात विभागणी करण्यात आली आणि प्रत्येक गटाला यू–कनेक्ट अभ्यासक्रमातील एकेक विषय देण्यात आला.

दुसऱ्या व तिसऱ्या दिवशी प्रत्येक गटाने वेगवेगळ्या विषयावर अभिरूप सत्र सादर केले. प्रतिक्रिया व पुढील कार्याचा कृती आराखडा या संबंधीच्या सत्राने कार्यक्रमाचे समापन झाले. या प्रशिक्षण कार्यक्रमामुळे सहभागी अभ्यासींना महाविद्यालयांमध्ये सत्रे संचालित करण्यासाठी आवश्यक असणारे धैर्य व क्षमता प्राप्त झाली.



तुमच्या केन्द्रामध्ये या उपक्रमाची सुरुवात कशी करावी यासाठी uconnect@srcm.org या मेल आयडीवर इमेल करावा अथवा आपल्या विभागप्रमुखांशी संपर्क साधावा.

# युवा उपक्रम



## त्रिची, तामिळनाडू

दि. १६ ते १७ ऑगस्ट रोजी त्रिची येथील आश्रमात विभाग क्र. २ब मधील १८ ते ३५ वयोगटातील ४७ अभ्यासींसाठी दोन दिवसांच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले होते. निसर्गोपचार, आत्मशोध, संघभावना, नेतृत्वगुण आणि स्वतःला सुसज्ज करणे आदि विषयांवरील ज्ञान समृद्ध करणाऱ्या सत्रांचा कार्यक्रमात समावेश होता. स्वयंपाकगृहातील स्वयंसेवकांनी अग्नीचा वापर न करता स्वयंपाक केला.

ध्यान व सहजमार्ग साधनेचे महत्व युवावर्गास पुन्हा एकदा विशद करून सांगणारी सत्रेही कार्यक्रमात होती. कार्यक्रमातील भाषणांमधून सहभागींमध्ये प्रेरणेची ज्योत प्रज्ज्वलित झाली आणि स्वतः गुरुदेवांनी म्हटल्याप्रमाणे 'गर्जना करणाऱ्या अंतस्थ सिंहाच्या' धैर्याने कोणत्याही गोष्टीस सामोरे जाण्यासाठी लागणारा निर्धार सहभागी अभ्यासींच्या हृदयात जागृत झाला.

## बंगलोर, कर्नाटक

दि. २१ सप्टेंबर रोजी बनशंकरी आश्रमात बंगलोरमधील ३५ युवा अभ्यासी 'संवाद' या विषयावरील एका दिवसाच्या कार्यक्रमासाठी जमले होते. आंतरिक 'स्व'शी तसेच इतरांशी संवाद साधण्याचे महत्व, दुसऱ्यांचे म्हणणे ऐकून घेण्याने होणारे फायदे आणि सहजमार्ग साधनेबद्दल इतर लोकांना माहिती कशी द्यावी इ. गोष्टी स्पष्ट करून सांगणे हा या कार्यक्रमाचा उद्देश होता. विषयमांडणीत अधिक स्पष्टता यावी या हेतूने प्रत्येक सत्रामध्ये गुरुदेवांच्या त्या त्या विषयावरील भाषणाची व्हिडीयो क्षणचित्रे दाखविण्यात आली. आंतरिक 'स्व'शी संवाद साधण्याचे महत्व या विषयाचा एक भाग म्हणून प्रत्येक सहभागी अभ्यासीला व्हिस्पर्समधील एकेका संदेशावर चिंतन व मनन करण्यास सांगण्यात आले. त्यानंतर चिंतन व मनन यामधून सुचलेले विचार व जाणवलेल्या भावना जोडीदारासमवेत वाटून घेतल्या गेल्या वेगवेगळ्या परिस्थितीशी व वातावरणाशी अनुरूप अशा संवादाचे विविध प्रकार 'बटण दाबणे' या खेळातून तपासून पाहता आले. आणखी एका खेळामधून, उत्तम श्रोता होण्यासाठी लागणारे कौशल्य व त्याचे महत्व प्रदर्शित करण्यात आले.

विशिष्ट श्रोतृसमुदायासमोर गुरुदेवांनी सादर केलेले एकेक भाषण प्रत्येक गटाला देण्यात आले. गटामध्ये त्यावर चर्चा केल्यानंतर गटातील कोणा एकाने प्रातिनिधिक स्वरूपात गटात झालेल्या चर्चेचा सारांश सांगितला. त्यानंतर 'ओह!' खेळ खेळण्यात आला. या खेळातून एकच शब्द भिन्न स्वरांमध्ये व चेहऱ्यावरील वेगवेगळ्या हावभावासहित उच्चारला तर त्याचा अर्थ कसा बदलत जातो, हे दिसून आले.

सहजमार्ग साधनपद्धतीचे मूलभूत तत्वज्ञान समजण्यासाठी वाचलीच पाहिजेत अशा पुस्तकांची एक यादी सहभागी अभ्यासींना देण्यात आली. त्यावेळी अशी सूचना करण्यात आली की दर रविवारी ज्या स्वयंसेवकांना मोकळा वेळ असेल त्यांनी आपापले काम संपल्यावर एकत्र जमून अर्धा तास पुस्तक वाचन करावे.

# निबंध मूल्यांकनावर कार्यशाळा

नुकत्याच पार पडलेल्या निबंध लेखन कार्यक्रम-२०१४ अंतर्गत प्राप्त झालेल्या निबंधांचे मूल्यांकन विभागीय स्तरावर करण्यात आले.




## भोपाळ, मध्यप्रदेश विभाग क्र. ८अ

मूल्यांकनाच्या मार्गदर्शक तत्वांबाबत जागृती निर्माण व्हावी हा ही कार्यशाळा आयोजित करण्याचा हेतू होता. काही भाषणे झाल्यानंतर प्रत्येकाला एका प्रश्नावलीतील प्रश्नांची उत्तरे लिहिण्यास सांगण्यात आले. बऱ्याचशा शंका दूर होण्यासाठी याचा उपयोग झाला. सर्व सहभागी अभ्यासींना नमुन्याचे निबंध तपासण्यासाठी दिले गेले. त्यानंतर मूल्यांकनाचे निकष व पद्धत यावर सादरीकरण करण्यात आले. सहभागी अभ्यासींना त्यांनीच तपासलेले तेच निबंध नंतर जे काही शिकविण्यात आले ते विचारात घेऊन पुन्हा एकदा तपासण्यास सांगण्यात आले. एक खुले सत्र झाल्यावर व सहाय्यक बंधू सुदर्शनसिंग (बाहेरी केन्द्र), बंधू डॉ. राजीव कुमार (आग्रा केन्द्र) व बंधू विनोदकुमार (सितापूर केन्द्र) यांनी प्रतिक्रिया दिल्यावर कार्यशाळा समाप्त झाली.

## गाझियाबाद, उत्तरप्रदेश, विभाग क्र. १२अ

दि. २७ व २८ सप्टेंबर रोजी ७०० प्रवेशिकांपैकी ४५० प्रवेशिकांची प्राथमिक छाननी केल्यावर त्यातून ४० निबंधांची अंतिम निवडीसाठी जागतिक मुख्यालय, मणपाक्कम, चेन्नई येथे पाठविण्यासाठी लघुसूची तयार करण्यात आली. आसपासच्या केन्द्रांतील जवळजवळ ५० अभ्यासी मूल्यांकनकर्ते म्हणून उपस्थित होते.





# आपल्या साधनेला नियमित करणे

## गुरगाव, दिल्ली

दिल्लीस्थित विभागीय आश्रमात प्रत्येक रविवारी 'क्रियात्मक साधना' या विषयावर हिन्दीमधून कार्यशाळा घेण्यात येते. ऑगस्ट महिन्यापासून सुरु झालेल्या या तीन तासांच्या सत्रांनंतर सत्संग होतो. आतापर्यंत सहजमार्ग साधनेची मूलतत्वे, गुरु, बंधूभाव, रोजनिशी (डायरी) लेखन, शुद्धीकरण (सफाई), चारित्र्यनिर्मितीची साधने व ध्यान या विषयांचा समावेश करण्यात आला आहे. ऑक्टोबर महिन्यापासून सहजमार्गाच्या दहा सूक्तांचा अन्तर्भाव करण्यात येणार आहे. प्राथमिक साधना करताना अभ्यासींना नव्याने जोम यावा हा या कार्यशाळांचा उद्देश आहे. अशातऱ्हेने पुढाकार घेतला गेल्यामुळे साधनापद्धतीबद्दल अधिक स्पष्टता निर्माण झाली तसेच अभ्यासींची हृदये खुली होऊन परस्परांमध्ये प्रभावीपणे चर्चा करण्यासाठी व बंधूभाव वाढीस लागण्यासाठी त्याची मदत झाली.

## ओंगोल, आंध्र प्रदेश



अभ्यासींना साधना नियमितपणे करण्यासाठी प्रवृत्त करण्याच्या प्रयत्नांचा एक भाग म्हणून दि.२८ सप्टेंबर ते ४ ऑक्टोबर असा सात दिवसांचा एक कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. त्यासाठी १८ अभ्यासी उपस्थित होते. त्यामध्ये सतत स्मरण व सहजमार्गाची दहा सूक्ते यासह साधनेच्या सर्व पैलूंचा डिव्हीडी व सादरीकरणे यांच्या आधारे अत्यंत काळजीपूर्वक समावेश करण्यात आला होता. बंधू एम. भास्कर (केंद्रप्रमुख) यांनी संपूर्ण कार्यक्रमात सहभागी होऊन अभ्यासींना प्रोत्साहन दिले.

## करुमथमपट्टी, तामिळनाडू पश्चिम



भगिनी ए. के. मुथुलक्ष्मीने दि. २१ सप्टेंबर रोजी संयोजित केलेल्या 'अनुभवांची देवाणघेवाण' यावरील सत्रात कोईंबतूरपासून २०कि.मी. अंतरावरील करुमथमपट्टी केन्द्रातील २० अभ्यासींनी भाग घेतला. सहजमार्ग साधना सुरु केल्यानंतर स्वत:मध्ये काय बदल झाल्याचे निदर्शनास आले यावर चर्चासत्रात लक्ष केंद्रित करण्यात आले होते. आपल्यामध्ये जे गुणात्मक बदल झाल्याचे अभ्यासींनी सांगितले त्यात गुरुदेवांप्रती वाढते प्रेम व श्रद्धा, राग येण्याचे प्रमाण कमी होणे, असूयेची भावना कमी होणे, सहनशीलता व संयम यात वाढ, वाढलेला आत्मविश्वास, कमी झालेल्या चिंता, वाढता साधेपणा व बंधूभावाची वृद्धी होणे आदि गुणांचा समावेश होता. प्रत्येकाचे अनुभवकथन ऐकणे खूपच रंजक होते व सर्व अभ्यासींनीही कार्यक्रमाचा आनंद लुटला.

## गुलबर्गा, कर्नाटक



दि. ६ व ७ सप्टेंबर रोजी मिशनच्या पुस्तकांच्या वाचनाचे महत्व या विषयावर एक कार्यक्रम गुलबर्गा आश्रमात आयोजित करण्यात आला होता. गुलबर्गा, बिदर, हुमनाबाद, चांग्लेर, चितापूर, सेडम, चिंचोली, शोरापूर, गोगी व अन्य केन्द्रांतून सुमारे १५० अभ्यासी कार्यक्रमास उपस्थित होते. सकाळच्या सत्संगानंतर अनेक उदाहरणे, वर्णनात्मक रेखाचित्रे, गुरुदेवांच्या भाषणांच्या दृकश्राव्य चित्रफिती/क्षणचित्रे इत्यादीसह काळजीपूर्वक रचना केलेले सादरीकरण प्रस्तुत करण्यात आले. संध्याकाळच्या सत्संगाने कार्यक्रमाची सांगता झाली. कार्यक्रमामुळे आनंद व लाभ झाल्याचे मत सर्व अभ्यासींनी व्यक्त केले.

## त्रिची, तामिळनाडू पूर्व

दि.१४ सप्टेंबर रोजी एक केंद्रीय संमेलन भरविण्यात आले होते. विभाग क्र. २ब (तामिळनाडू पूर्व) मध्ये तीन केंद्रस्थानांचा समावेश होतो : विल्लुपुरम, त्रिची आणि तंजावर. बंधूभाव वाढीस लागावा या हेतूने या तीनही केंद्रांत तीन–चार महिन्यांच्या अंतराने एका मेळाव्याचे आयोजन करण्यात येते.

'ध्येयाकडे पोहोचण्याचा मार्ग' हा यावेळच्या मेळाव्याचा विषय होता. सहनशीलता, इच्छाशक्ती, समर्पण, सेवा, आज्ञापालन, श्रद्धा व दृढ विश्वास, सहयोग व बंधूभाव आणि प्रेम आदि विषयांपैकी एकेक विषयावर एकेका केंद्रातील अभ्यासी पूर्ण तयारी करून आले होते. मुले व युवावर्गाच्या सांस्कृतिक कार्यक्रमाने दिवसाची सुरुवात झाली. विविध विषयांवरील सत्रे संपल्यानंतर सत्संगाने दिवसाची अखेर झाली.



## कडलोर, पुर्व तामिळनाडू

दि. २१ सप्टेंबर रोजी पार पडलेल्या केंद्रीय वार्षिक संमेलनामध्ये पॉंडीचेरी, कडलोर आणि इतर उपकेंद्रामधील अभ्यासी उपस्थित होते. एस.एम.एस.एफ. ला ध्यानगृह देणगीच्या स्वरुपात मिळाल्यानंतर या जागेत हा पहिलाच मोठा कार्यक्रम होता. 'सहजमार्गाची मूलतत्त्वे' या विषयावर समूहचर्चा आयोजित करण्यात आल्या होत्या आणि त्यानंतर 'साक्षात्कार' या विषयावर वक्त्यांनी उपस्थितांना संबोधित केले. 'इंडिया इन द वेस्ट' ही डि.व्ही.डी. सादर करण्यात आली आणि कडलोर येथील दोन अभ्यासींनी बंधू प्रशांत वासूंच्या 'ॲट द फीट ऑफ द मास्टर –द बिकमींग ऑफ अ डिसायपल' या पुस्तकावर आधारीत सादरीकरण प्रस्तुत केले.

## वडोदरा, गुजरात

वडोदरा शहराचे ७ विभाग बनविण्यात आले असून, प्रत्येक विभागामध्ये विशिष्ट कार्यक्षेत्राची जबाबदारी देऊन स्वयंसेवकाची एक तुकडी नेमण्यात आली आहे. साधना अधिक चांगल्या पद्धतीने व्हावी व साधनेच्या गुणवत्तेमध्ये सुधारणा व्हावी यासाठी घरगुती मेळावे, खुली सत्रे आणि इतर उपक्रम हाती घेण्यात आले आहेत. दि. १३ सप्टेंबर रोजी मकरपुरा आणि मंजलपुर येथील सुमारे पंचेचाळीस अभ्यासी 'जीवनाचे ध्येय' या विषयावरील कार्यशाळेमध्ये सहभागी होण्यासाठी जमले होते. सत्संगानंतर अभ्यासींना 'त्यांच्या जीवनामधील ध्येय' दैनंदिनीमध्ये लिहिण्याची विनंती करण्यात आली आणि नंतर त्यावर चिंतन करण्यासाठी तीन प्रश्न देण्यात आले. 'सत्योदय' या पुस्तकामधील 'जीवनाचे ध्येय' या पाठामधून एका उताऱ्याचे वाचन ऐकल्यानंतर, या विषयी झालेल्या आकलनाची परस्परांमध्ये देवाणघेवाण करण्यासाठी अभ्यासींना छोट्या गटांमध्ये विभागण्यात आले. नंतर एका प्रशिक्षक बंधूनी श्रोत्यांना या विषयावर संबोधित केले आणि अभ्यासींनी जोड्या बनवून आपापले अनुभव परस्परांमध्ये कथन केले. शेवटी अभ्यासींनी 'त्यांच्या जीवनामधील ध्येय' आणखी एकदा दैनंदिनीमध्ये लिहीले आणि यावेळी ते या विषयाच्या नव्याने झालेल्या आकलानावर आधारीत होते. ही कार्यशाळा अतिशय फलदायी ठरली.



## तिरुपुर, तामिळनाडू पश्चिम

दि. ५ ऑक्टोबर रोजी चेट्टीपलायम आश्रमामध्ये सकाळच्या सत्संगानंतर बंधू एन. प्रकाश यांनी सप्टेंबर महिन्याच्या शेवटी मणपाक्कम येथे पार पडलेल्या प्रशिक्षकांच्या परीसंवादाविषयी श्रोत्यांना थोडक्यात संबोधित केले. यावेळी तेथे जमलेल्या सुमारे सहाशे अभ्यासींनी अल्पोपहारानंतर त्यांच्या प्रशिक्षकांसोबत (ज्यांच्याकडे ते वैयक्तीक सिटींग घेतात) गट बनवले. परिसंवादादरम्यान बंधू कमलेश यांनी रोजची साधना ठराविक वेळीच करावी यावर भर दिल्याचे प्रशिक्षकांनी नमूद केले. आपल्या घरामध्ये साधना करणे कठीण होत असेल तर असे अभ्यासी एकत्र येऊन ध्यान करु शकतात असे सूचित करण्यात आले. या चर्चेचा मूळ उद्देश अभ्यासींच्या साधनेमध्ये उत्कटता निर्माण करणे हा होता. उत्तम परीणाम होण्यासाठी किमान दहा दिवस निग्रहाने साधना करावी असे कमलेश भाईंनी सुचवले आहे. या चर्चेनंतर अभ्यासी या सूचना अंमलात आणण्याचा निग्रह करुन परतले. सध्या शहरामध्ये रोज सकाळी सहा वाजता दोन ठिकाणी सत्संग होतो आहे.

## विट्टल ,तटीय कर्नाटक

दि. २१ सप्टेंबर रोजी 'ध्येय' या विषयावर पूर्ण दिवसीय कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. सुमारे सोळा अभ्यासी या कार्यक्रमाला उपस्थित होते आणि ध्येयाविषयी त्यांची कल्पना त्यांच्या साधनेतील प्रगतीप्रमाणे कशी बदलत गेली याविषयी त्यांचे विचार त्यांनी परस्परांशी व्यक्त केले. बाबूजी महाराजांच्या पुस्तकामधील उतारे वाचताना, 'गुरुदेव' हेच आपल्या जीवनाचे खरे ध्येय असल्याची जाणीव त्यांना झाली. यावेळी ध्येय साध्य (संपादन) करण्याच्या विविध पद्धतींवर त्यांच्यामध्ये चर्चा झाली आणि प्रार्थनेच्या पहिल्या ओळीच्या – 'हे नाथ, तूच मानव जीवनाचे वास्तविक ध्येय आहेस' अर्थावर चिंतन करत या कार्यक्रमाची सांगता झाली.





## ग्राउंडिंग इन द प्रॅक्टिस (जी.आय.टी.पी.) साधनेचा पक्का पाया

हा प्रशिक्षण कार्यक्रम देशभरातील केंद्रांमधून अतिशय जोमाने पार पडत आहे. या प्रशिक्षण कार्यक्रमामध्ये ध्यान, सफाई, दैनंदिनी लिखाण आणि प्रार्थना हे चार भाग समाविष्ट आहेत.



बिकानेर

दि. २१ सप्टेंबर रोजी राजस्थानमध्ये बिकानेर येथे आयोजित केलेल्या प्रशिक्षण कार्यक्रमामध्ये बिकानेर, लड्नुन, जसवंतगड, दिडवाना, कुचेरा आणि श्रीगंगानगर या केंद्रांमधील सुमारे ८५ अभ्यासींनी सहभाग घेतला.



हापुर



गोवा

दि. १६ आणि १७ ऑगस्ट रोजी गोवा येथे आयोजित केलेल्या कार्यक्रमामध्ये गोवा, कारवार आणि कोल्हापुर या केद्रांमधील सुमारे बत्तीस अभ्यासी उपस्थित होते.



त्रिप्रयार

दि. १२ ऑक्टोबर रोजी केरळमध्ये त्रिप्रयार येथे आयोजित करण्यात आलेल्या सत्रामध्ये सुमारे चौतीस अभ्यासी सहभागी झाले होते.

दि. ७ सप्टेंबर रोजी उत्तर प्रदेश येथे हापुर आश्रमामध्ये आयोजित केलेल्या प्रशिक्षण कार्यक्रमाचा सुमारे सत्याऐंशी अभ्यासीनी लाभ घेतला.

## सहजमार्गाचा प्रसार

एकोजच्या चमूला भारतामध्ये विविध केंद्रांमध्ये आयोजित करण्यात आलेल्या खुल्या सत्रांविषयी बरेच लेख मिळाले. त्यापैकी काही कार्यक्रमांची छायाचित्रे खाली दिली आहेत.



आग्रा



ग्वालियर



पुलियामपट्टी



खतौल्ली



वलसाड



भिलवाडा

## नवीन प्रकाशन वितरण



व्हॉट इज सहज मार्ग


व्हॉट इज सहज मार्ग कन्नड




डिवोशन इंग्लिश


हृदयीचे बोल २०११ मराठी



हृदयीचे बोल २०१३ इंग्लिश


हृदयीचे बोल२०११ हिन्दी



माझे गुरुदेव एमपी३ ऑडीयोबुक गुजराती

## क्षणचित्रे




**बल्लिया, उत्तर प्रदेश**

दि. १४ सप्टेंबर रोजी, बल्लिया मधील तंत्रनिकेतन महाविद्यालयात एक युवा चर्चासत्र आयोजित करण्यात आले होते. त्याचा विषय होता 'तारुण्य: आश्वासन आणि परिश्रमाचा काळ.' जवळपास १०० विद्यार्थी, २५ शिक्षक, व पालक या चर्चासत्रास हजर होते.



**बाल आणि युवा केंद्र, कोलकाता**

कोलकाता आश्रमात येणाऱ्या मुलांची वाढती संख्या व त्यांच्या गरजा लक्षात घेऊन पूज्य गुरुदेवांच्या कृपेने व परवानगीने स्वतंत्र बाल व युवा केंद्र दालन बांधण्यास मंजुरी देण्यात आली आहे. मुले खेळण्यास वापरत असलेल्या मोकळ्या जागेवर साधे बांधकाम करण्यात आले आहे. कोलकाता आअश्रमात दि. १४ सप्टेंबर रोजी, बाल व युवा केंद्राच्या समर्पित स्वयंसेवकांच्या मार्गदर्शनाखाली मुलांनी एका साध्या सोहळ्यादरम्यान या नवीन सुविधेचे उद्घाटन केले.

## मूल्य शिक्षणाच्या अद्ययावत नोंदी

### नवी दिल्ली

एप्रिल २०१४मधे ॲम्बीयंस पब्लिक स्कूलमधे या कार्यक्रमाची सुरुवात झाली होती. आठवड्यातून एकदा शिकवणूक वर्ग घेतले जातात. विद्यार्थ्यांनी सुरवातीला जरी विशेष रस दाखवला नसला तरी पहिल्या तीन धड्यांच्या शेवटी ८ वी ते १२ वी चे वर्ग अभ्यासक्रमात स्थिरावले आहेत. विनम्रतेला मूल्य म्हणून स्वीकारण्याच्या कल्पनेला खूप विरोध झाला. या शिकवणुकीतून अल्प का असेना, पण प्रत्येक विद्यार्थी काही ना काही घेत आहे.

पश्चिम दिल्लीतील, विद्याभारती स्कूल या दुसऱ्या संस्थेत जुलै २०१४ मध्ये इ. ८वी व ९वी साठी शिकवणूक वर्ग सुरु झाले आहेत. शाळेतील विद्यार्थ्यांची संख्या खूप आहे. दोन्ही वर्गांच्या मिळून ७ तुकड्यांमधील विद्यार्थ्यांची एकूण संख्या अंदाजे ४०० आहे. दिल्लीमध्ये असूनही दोन्ही शाळांचे सामाजिक व आर्थिक स्तर भिन्न आहेत तरी सुध्दा प्रतिसाद जवळपास सारखाच आहे.

### मुंबई, महाराष्ट्र

दि. २७ ऑगस्ट रोजी जे. एच. अंबानी विद्यामंदीर–मराठी माध्यम शाळा, नागोठणे येथे झालेल्या जागरुकता कार्यक्रमासाठी सुमारे ४५ शिक्षक हजर होते. हा कार्यक्रम सीमा त्रिपाठी यांनी सौम्य परंतु परीणामकारकरित्या संचालित केला. कार्यक्रमाच्या शेवटी काही शिक्षकांनी ध्यानाविषयी माहिती विचारली. ५ ते ६ शिक्षकांनी स्वयंसेवकांना मदत करण्याचे आश्वासन दिले आणि ८वी व ९वीच्या वर्गांसाठी शिकवणी वर्ग आयोजित करण्याचे सुचविले. मुलांचा विकास माणुसकीने परिपूर्ण अशा मानवात होण्यास मदत करणाऱ्या, समान अशा ध्येयासाठी मूल्य शिक्षण फारच महत्वाचे असल्याचे प्रतिपादन मुख्याध्यापिकांनी केले. स्वयंसेवकांना पूर्ण मदत करण्याचे आश्वासन त्यांनी दिले.

E mail vbe@shpt.in तुम्ही जर मुल्य शिक्षण कार्यक्रम तुमच्या केंद्रातील शाळेमधे करु इच्छित असाल तर तुमच्या विभाग प्रमुखांशी संपर्क साधा.

## शोलावंदन आश्रम, तामिळनाडू

## प्रकाशाचे केंद्र







शोलावंदन हे मदुराईपासून २८ कि.मी वर असलेले एक पंचायत शहर आहे. डॉ. सदयाण्डि यांनी त्यांच्या घरी दि. ५ ऑगस्ट १९८७ रोजी औपचारिकपणे एसआरसीएमचे केंद्र सुरू केले होते. सुरवातीच्या काळात सुमारे १५ अभ्यासी सत्संगास हजर असत. गुरुदेवांनी ७०च्या व ८०च्या दशकांदरम्यान शोलावंदनला अनेकदा भेट दिली होती व डॉ. सदयाण्डि यांच्या घरी सत्संगांचे संचालन केले होते. त्यांनी या केंद्राच्या विकासात वैयक्तिक रस दाखवला होता.

**आश्रम**



जेव्हा आश्रमाची गरज वाटू लागली तेव्हा डॉ. सदयाण्डि यांनी शोलावंदन रेल्वे स्थानकाजवळील २ एकर ४३ सेंट्स जमीन विकत घेतली, त्यापैकी १ एकर २० सेंट्स आश्रमासाठी देण्यात आली. अभ्यासींच्या देणगीतून तसेच मुख्यालयाच्या आर्थिक मदतीतून १९९६ साली आश्रमाचे बांधकाम सुरू झाले. संयुक्तसचिव बंधू ए.पी. दुराई, यांनी बांधकाम सुरू असताना दि. २४ ऑगस्ट १९९८ रोजी केंद्रास भेट दिली व आवश्यक ती मदत देऊ केली. आश्रमाची नोंदणी दि.१२ मे १९९९ रोजी करण्यात आली व त्याचे उद्घाटन गुरुदेवांनी दि. १२ जानेवारी २००० या दिवशी केले. या उद्घाटन सोहळ्यास विविध केंद्रातील सुमारे ३०० अभ्यासी जमले होते.



ध्यानकक्ष ५२ फूट गुणीले २२ फूट आहे व त्याची क्षमता सुमारे २०० अभ्यासींची आहे. याशिवाय आश्रमात एक स्वयंपाकघर, वाचनालय व स्वच्छतागृहेही आहेत. अनेकदा झालेल्या खुल्या सत्रांमुळे अभ्यासींची संख्या निश्चितपणे वाढली आहे व सुमारे ११० अभ्यासी या केंद्रात आहेत. येथे होणाऱ्या रविवारच्या सत्संगास ते नियमितपणे हजर असतात. प्रत्येक महिन्याच्या तिसऱ्या रविवारी पूर्ण दिवसीय कार्यक्रम आयोजित केला जातो व चौथा रविवार स्वयंसेवेचा दिवस असतो. केंद्राचा युवा गट अतिशय खंबीर आहे व ते आध्यात्मिक जाणीवेचा प्रसार करत आहेत. ते क्रेस्टच्या कार्यक्रमात सहभागी होतात, साधनेच्या जागरुकतेसंबंधी नाटिका सादर करतात आणि गट चर्चेत, कौशल्य विकास कार्यक्रमातही भाग घेतात. या केंद्राने त्याच्या जवळपासच्या दिंडीगुल, बाटलागुंडु व वडिपट्टी या सारख्या उपकेंद्रांना त्यांच्या प्रारंभीच्या काळात मदत केली आहे.

To download or subscribe to this newsletter, please visit http://www.sahajmarg.org/newsletter/india For feedback, suggestions and news articles please send email to in.newsletter@srcm.org

© 2014 Shri Ram Chandra Mission ("SRCM"). All rights reserved. “Shri Ram Chandra Mission", "Sahaj Marg", “SRCM”, “Constant Remembrance” and the Mission's Emblem are registered Trademarks of Shri Ram Chandra Mission.This Newsletter is intended exclusively for the members of SRCM. The views expressed in the various articles are provided by various volunteers and are not necessarily those of SRCM.